ISSN 2278-8808
SJIF 2013 = 4.194
An International Peer Reviewed
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# भारतातील कमी तीव्रतेचा संघर्ष नक्षलवाद - अंतर्गत सुरक्षेसमोरिल आव्हान

डी. बी. वाघ, कला महाविद्यालय बामखेडे त.त.ता. शहादा जि. नंदुरबार.

Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com 4.194, 2013 SJIF. © SRJIS 2014

## प्रस्तावना

भारत सध्या विविध गुंतागुंतीच्या सुरक्षा विषयक समस्यांना सामोरा जात आहे. यामध्ये देशातील बेरोजगारी, दारिद्रयता, विकासाचा नावावर विस्थापन, निर्वासित नागरिक, असमतोल विकास, राजकिय ऊदासिनता, भ्रष्टाचार, मोर्चे, संप, जातीयता, धार्मिकता, दंगे, बंडखोरी, या सारख्या अनेक समस्या कमी तीव्रतेचा संघर्षाचा स्वरुपात देशासमोर आव्हान बनत आहे. मुळातच भारताला स्वातंत्र्य मिळाले ते दिर्घ अशा ब्रिटेशा विरुध्द कमी तीव्रतेचा संघर्ष उभारुन होय हा संघर्ष हिंसक व अहिंसक अशा स्वरुपाचा होता. भारताचा या संघर्षाला कमी तीव्रतेच्या संघर्षामध्ये विशेष महत्व आहे. आज देशातील बहुतेक क्षेत्र कमी तीव्रतेचा संघर्षाने व्यापलेले आहे. अशा संघर्ष दोन भागात प्रामुख्याने दिसून येतो. पहिला म्हणजे देशातील असमाधानी घटक जे बंडखोरी, क्रांतीकारी संघर्ष, दहशतवाद, नगरी संघर्ष अथवा नक्षलवाद सारख्या मार्गाचा स्विकार करतांना दिसतात. तर दुसरा म्हणजे परकिय सत्तेशी शत्रुत्वामुळे निर्माण झालेल्या मर्यादित युध्दाचा भाग होय. देशात आज दहशतवाद, बंडखोरी, फुटिरतावाद, नक्षलवाद सारखे सुरक्षा प्रश्न अस्तित्वात असुन कमी तीव्रतेचा संघर्षाचा स्वरुपात अंतर्गत सुरक्षेला आव्हान ठरत आहे. यामध्ये ईशान्ये कडिल राज्यातील बंडखोरी, जम्मु कश्मिर तथा देशातील इतरत्र पसरलेला दहशतवाद तसेच पुर्वेत्तर राज्यातील नक्षलवाद मुख्य सुरक्षा प्रश्न ठरतात. त्याच प्रमाणे पाकिस्तान सोबत मर्यादित युध्दाच्या पार्श्वभूमीचा अनुभव समोर आहे. एकूणच देशाचा अंतर्गत सुरक्षेचा विचार करतांना देशातील कमी तीव्रतेचे संघर्ष दुर्लक्षित करता येणार नाही.

नक्षलवाद देखील अशाच कमी तीव्रतेचा संघर्ष भारताचा अंतर्गत सुरक्षेला मोठा धोका ठरत आहे. वर्तमान पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांनी सुध्दा हे मान्य केले आहे कि, नक्षलवाद सुरक्षेला एक मोठे आव्हान आहे. नक्षल समस्येवर खऱ्या अर्थाने गंभीर चर्चा घडून आलेली नाही. तेव्हा नक्षलवाद समस्येची तीव्रता समजुन घेण्यासाठी त्याच्या विषयी थोडक्यात माहिती घ्यावी लागेल.

**भारतातील नक्षलवाद चळवळ -** आज भारतील एकूण १४ राज्यात १७० जिल्हयात पसरलेल्या नक्षलवादी चळवळीचा ऊगम पश्चिम बंगालमध्ये १९७१ मध्ये झाला. नक्षलवाद हे नाव पश्चिम बंगाल मधील नक्षलबारी या खेडयाहून घेण्यात आले आहे. नक्षलबारी येथे स्थानिक जमिनदाराच्या अन्यायास दुर करत २५ मे १९६७ रोजी आदिवासी जमातीने आपल्या जमिनी परत मिळविण्यासाठी तिरकामठयाचा बळावर सशस्त्र लढा उभारला होता. या लढयाचे लोण लवकरच इतर प्रदेशात वेगाने पसरले आदिवासी जमात, गरीब शेतकरी वर्ग, मजूर वर्ग शोषित वर्ग यांनी सरंजामशाही विरुध्द सशस्त्र लढा पुकारला या लढयाची सुरुवात नक्षलबारी येथून असल्याने त्यास नक्षलवाद हे नाव दिले गेले. माओच्या वचनानुसार 'जर कुठे क्रांती होत असेल तर क्रांतीकारक पक्षाची आवश्यकता असते' त्याला अनुसरुन २२ एप्रिल १९६७ रोजी भारतीय कम्युनिष्ट पक्षाची स्थापना करण्यात आली. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना एकत्र करणे, गनिमी लढयासाठी तयार करणे, ग्रामीण भागातील शक्तीचा लढावर शहरावर नियंत्रण स्थापने आणि शेवटी सरंजामशाही पासून देशाला स्वतंत्र करणे, हे या पक्षाचे प्रथम ध्येय ठरले होते. सुरुवातीपासून नक्षलवादी चळवळीवर माओ-त्से-तुंग व लेनिन या सारख्या नेत्यांच्या सामान्यवादी विचारांचा प्रभाव दिसून आलेला आहे.

नक्षलवादी चळवळीने आपल्या उगमापासूनच हिंसक मार्गाचा अवलंब केलेला आहे. चारु मुजुमदार नक्षलवाद्यांचे एक प्रणेत यांच्या मते, शेतकरी, मजूर वर्ग, गरिब आदिवासी यांचा दुर्दशेला भारतातील जामिनदार वर्ग, श्रीमंत वर्ग व सरकारच जबाबदार आहे . नक्षलवाद्यांच्या हिंसक कार्यवाहयाचे लक्ष देखील अशाच अन्यायास कारणीभूत असणारा वर्ग राहिला आहे. नक्षलवादाचा देशात उगम होताच बंडखोरी उफाळून येण्याची शक्यता चारु मुजुमदार यांनी व्यक्त केली होती. त्याला अनुसरुनच आंध्र प्रदेशातील श्री काकुलाम, पश्चिम बंगाल मधील देब्रागोपी, बल्लवपूर, बिहारच्या मुशाहिरी, उत्तर प्रदेशातील लखीमपूर या क्षेत्रात तीव्र हिंसक संघर्षाच्या अनेक घटना घडल्या होत्या. यावेळी सरकारने देखील नक्षलकार्य वाहयाची गंभीर दखल घेत पोलिस

व लवकर यांचा संयुक्त मोहिमा राबविल्या होत्या. ज्याचा परिणाम नक्षलवाद्यांचा कार्यावाहयावर काही प्रमाणात अंकुश ठेवणे शक्य झाले होते. शिवाय १६ जुलै १९७२ रोजी चारु मुजुमदार यांना अटक केली गेली. या परिस्थितीचा परिणाम नक्षलवाद्यांचा कार्यवाहय मर्यादित होण्यावर आला. परंतु आंध्र प्रदेशात कोंडापल्ली सीतारामय्या यांच्या नेतृत्वाखाली १९८० साली ' पीपल्स वॉर ग्रुप ' या संघटनेच्या स्थापने बरोबर नक्षलवादास नवसंजीवनी प्राप्त करुन दिली. या संघटनेच्या कार्यावाहयामुळे मात्र नक्षलवाद गोरगरिबांत रुजलेला दिसतो. पुढील काळात नक्षलवाद्यांच्या हिंसक घटनामध्ये कमालीची वाढ झाली परिणामी देशाच्या अंतर्गत सुरक्षेच्या दृष्टया, एक धोका म्हणून नक्षलवादी चळवळीस दिले गेले.

**मुल्यमापन -**

नक्षलवाद समस्या सुरक्षेला धोका असतांना देखील या समस्येकडे खऱ्या अर्थाने गांभीर्याने कधी पाहिले गेले नाही. ज्यामुळे देशातील बरेच मोठे क्षेत्र व्यापणे या चळवळीस शक्य झाले. नक्षलवाद सारखी समस्या अधिक काळ पर्यंत ताटकळत ठेवणे सुरक्षेला केव्हाही धोकेदायक आहे. ज्या पश्चिम बंगालमध्ये नक्षल समस्येचा उगम आढळतो तेथे ही समस्या नाममात्र अस्तित्व टिकवून आहे. मात्र देशाच्या १४ राज्यातील नक्षलवाद्याच्या हिंसक घटनांची तीव्रता लक्षणीय आहे. साम्यवादी विचार प्रणालीवर उगम पावलेल्या या चळवळीच्या ध्येय तथा कार्य प्रणालीत कमालीची हिंसक वृत्ती बळावली आहे. शेतकरी, मजूर, आदिवासी यांच्यासाठी लढणारी लक्षलवाद बऱ्याच प्रमाणात स्वतःचा अस्तित्वासाठीच झगडतांना दिसत आहे. नक्षलवादी चळवळी संदर्भात धोक्याची बाब अशी की या चळवळीकडे आदिवासी तरुणाप्रमाणे तरुणींचे वाढते आकर्षण होय. देशात राबविले जाणारे विकास प्रकल्प अनेकांच्या नशिबात विस्थापन आणीत आहे. या लोकांना योग्य न्याय न मिळाल्यास नक्षलवादी सारखी चळवळीस आपला स्वार्थ साधणे सहज शक्य होते. आजवर नक्षलवादाकडे सामाजिक आर्थिक वा कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणूनच बघितले गेले पाहिजे. समाधानाची बाब हीच की देश खऱ्या अर्थाने नक्षल समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न करित आहे. भारतासारख्या विविध समस्यांनी ग्रस्त देशाला नक्षलवाद केव्हाही धोकेदायक ठरेल. देशात विकासाच्या कितीही गप्पा मारल्या ती दारिद्रयता, बेरोजगारी, राजकीय उदासिनता विस्थापिताच्या समस्या, भ्रष्टाचार, बंडखोरी सारख्या समस्या मोठया प्रमाणात आहे. हिच परिस्थिती नक्षलवादास पोषक ठरणारी आहे. तेव्हा अगोदर या समस्या सोडविणे प्रथम ध्येय पाहिजे. राज्यांना आर्थिक दृष्टया अधिक सक्षम बनविले गेले पाहिजे. छत्तीसगढ मध्ये ज्याप्रमाणे लोकसहभागातुन नक्षलवादास नियंत्रण

**आणले गेले. त्या प्रकाराचा प्रयोग इतर नक्षलग्रस्त राज्यात राबविणे शक्य आहे. शिवाय नक्षलग्रस्त क्षेत्रात विकासाच्या विविध योजना राबवून युवकांसाठी नविन ध्येय धोरणे आखली पाहिजे. तसेच स्थानिक पोलीस दलास अधिक आधुनिक बनविले पाहिजे. शेवटी ज्या समस्यांच्या बळावर नक्षलवरद चळवळ तग धरु पाहत आहे तिच्या मुळावरच घाव घालत सक्षम उपाय योजिले गेले तर खऱ्या अर्थाने भारताचा अंतर्गत सुरक्षे समोरील कमी तीव्रतेच्या या संघर्षाला पुर्णविराम देता येईल.**

## संदर्भ ग्रंथ सुची


Lt. Col. Chadha, Low intensity confict in India, SAGE Publication, New Delhi, 2005.

Ibid -27.

Indian journal of strategic studies, vol. XXVIII, 2007, P.162

योजना, फेब्रु. ०७, पान नं. २

योजना, ऑक्टो. २००६ पान नं. २६